महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७९७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

=====================================================================

जा.क्र.तशिविकापू/विवि/ वाचन प्रेरणा दिन/२०२०/ 3112 दिनांक 1/10/20

:-

परिपत्रक :-

प्रति,
संचालक/प्राचार्य
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व संस्था

विषय :- माजी राष्ट्रपती स्वा.डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांचा दिनांक १५ ऑक्टोबर हा जन्मदिन **"वाचन प्रेरणा दिन "** म्हणून साजरा करणेबाबत..

संदर्भ:- १. मा.संचालक यांचे पत्र क्र १६/आस्था/संकीर्ण/२०२०/१६४ दिनांक २८/०९/२०२०
२. महाराष्ट्र शासन निर्णय क्र वाप्रदि-२०२०/प्र.क्र७०/भाषा-३ दिनांक १४ सप्टेबर २०२०

उपरोक्त विषयास अनुसरुन महाराष्ट्र शासन मराठी भाषा विभाग यांनी निर्गमित केलेला शासन निर्णय सोबत जोडण्यात आलेला आहे. माजी राष्ट्रपती स्वा.डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांचा दिनांक १५ ऑक्टोबर हा जन्मदिन " वाचन प्रेरणा दिन " म्हणून साजरा करण्यात येतो. या निर्णयास अनुसरुन शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची प्रेरणा निर्माण करण्यासाठी व वाचनाची आवड वृध्दीगत करण्याच्या द्दष्टीने यापूर्वी संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत.

१. ऑनलाईन कार्यक्रम/चर्चासत्रे/प्रशिक्षण हृ कोविडच्या पार्श्र्वभूमीवर काळाची गरज आहे. ही बाब लक्षात घेता वाचन संस्कृती वाढीस लागण्याच्या द्दष्टीने जास्तीत जास्त कार्यक्रम ऑनलाईन पद्वतीने करण्यात यावे.
२. जिथे प्रत्यक्षरीत्या कार्यक्रम करणे शकय आहे तिथे केंद्र शासन/राज्यशासन यांनी आखून दिलेल्या कोविड मार्गदर्शक तत्वांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.
३. वाचन संस्कृती जोपासण्यासाठी सर्वानी आपले मित्र, कुटुंबातील सदस्य इत्यादीना किमान एक पुस्तक पीडीएम स्वरुपात ऑनलाईन पद्वतीने पाठवून त्यांना वाचनास प्रोत्साहन द्यावे
४. Whats App,Internet, Facebook, Twitter अशा प्रकारच्या सामाजि प्रसार माध्यमातून वाचन संस्कृती वृर्ध्दीगत होईल/वाचनास प्रेरणा मिळेल असे संदेश प्रसारीत करावेत.
५. मराठी वाचन संस्कृती जपण्यासाठी सर्वानी डिजीटल माध्यमाचा जास्तीत जास्त वापर करुन मराठीतील साहित्य स्वयंस्फुतीने वाचकांना पाठवावे
६. सर्व संस्थांनी सोशल मीडियावर मराठी वाचन कट्टा निर्मिती करावी.

(डॉ.दि.रा.नंदनवार)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे

**माजी राष्ट्रपती स्व.डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा दिनांक १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस "वाचन प्रेरणा दिन" म्हणून साजरा करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**मराठी भाषा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: वाप्रेदि-२०२०/प्र.क्र.७०/भाषा-३,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
**दिनांक: १४ सप्टेंबर, २०२०**

आ.मु.स. उच्च व तंत्र शिक्षण ... कार्यालय
क्र. Gen. 685
दि. 21/9/2020

वाचा :- मराठी भाषा विभाग, शासन परिपत्रक क्र.वाप्रेदि-२०१५/प्र.क्र.८९/२०१५/भाषा-३, दिनांक १४ ऑक्टोबर, २०१५.

शासन परिपत्रक :-

माजी राष्ट्रपती स्व.डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या उद्देशाने दिनांक १५ ऑक्टोबर हा त्यांचा जन्मदिवस "वाचन प्रेरणा दिन" म्हणून साजरा करण्यात येतो. या निर्णयास अनुसरुन शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची प्रेरणा निर्माण करण्यासाठी व वाचनाची आवड वृध्दींगत करण्याच्या दृष्टीने यापूर्वी संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये सूचना देण्यात आल्या होत्या. सध्याच्या कोवीड – १९या संसर्गजन्य रोगाच्या प्रादुर्भावामुळे प्रतिबंधात्मक उपाय म्हणून संपूर्ण देशात काही निर्बंध घालण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर या वर्षी वाचन प्रेरणा दिन साजरा करण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे "वाचन प्रेरणा दिन" कार्यक्रम साजरा करण्याच्या दृष्टीने सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालये, शासकीय संस्था / मंडळ, सार्वजनिक उपक्रम इ. कार्यालयांनी देखील विविध उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. ऑनलाईन कार्यक्रम / चर्चासत्रे / प्रशिक्षण ही कोविडच्या पार्श्वभूमीवर काळाची गरज आहे. ही बाब लक्षात घेता वाचन संस्कृती वाढीस लागण्याच्या दृष्टीने जास्तीत जास्त कार्यक्रम ऑनलाईन पद्धतीने करण्यात यावे.

२. जिथे प्रत्यक्षरीत्या कार्यक्रम करणे शक्य आहे तिथे केंद्र शासन/राज्य शासन यांनी आखून दिलेल्या कोविड मार्गदर्शक तत्वांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

३. "वाचन संस्कृती" जोपासण्यासाठी सर्वांनी आपले मित्र, कुटुंबातील सदस्य इत्यादींना किमान एक पुस्तक पीडीएफ स्वरूपात ऑनलाइन पद्धतीने पाठवून त्यांना वाचनास प्रोत्साहन द्यावे.

४. WhatsApp, Internet, Facebook, Twitter अशा प्रकारच्या सामाजिक प्रसार माध्यमातून वाचन संस्कृती वृध्दींगत होईल /वाचनास प्रेरणा मिळेल असे संदेश प्रसारीत करावेत.

५. मराठी वाचन संस्कृती जपण्यासाठी सर्वांनी डिजीटल माध्यमाचा जास्तीत जास्त वापर करुन मराठीतील साहित्य स्वयंस्फुर्तीने वाचकांना पाठवावे.

६. सर्व संस्थांनी सोशल मीडियावर "मराठी वाचन कट्टा ' निर्मिती करावी.

DE/K

कार्य/ आ.2 893 28/9

पोबत मराठी भाषा विभाग यांचे "माजी राष्ट्रपती स्व.डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा दिनांक 15 ऑक्टोबर हा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करणेबाबत" या विषयाचा शासन निर्णय क्रमांक वाप्रेदि-2020/प्र.क्र.70/भाषा-3, दिनांक 14.9.2020 ची प्रत जोडत आहे.

---

क्रमांक : 16/आस्था/संकीर्ण/2020/९८४
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.1967,
मुंबई - 400 001.

दिनांक : 28 SEP 2020

प्रति,

1) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
2) सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.
   यांनी त्यांचे अधिपत्याखालील सर्व संस्था / कार्यालये प्रमुखांच्या निदर्शनास आणावे.

(प्रमोद नाईक)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : कार्यासन क्रमांक 2, 2अ व 10, १२ मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.